महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**संकीर्ण-०१२३/प्र.क्र.०८/२०२३/समन्वय** **दिनांक :- २६ एप्रिल, २०२४**

## -: प्रसिद्धिपत्रक :-

**विषय** :- दै.लोकसत्ता मधील दि.२६ एप्रिल, २०२४ रोजीच्या बातमी संदर्भातील वस्तुस्थिती

आज दिनांक २६ एप्रिल. २०२४ रोजी दै.लोकसत्ता या वृत्तपत्रात "एमपीएससी च्या परीक्षा, निकालांची प्रतिक्षाच" या मथळयाखाली बातमी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने मुलाखती, निकाल, अभ्यासक्रम इ. बाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | बातमीतील मुद्दा | वस्तुस्थिती |
|---|---|---|
| ०१ | **अभ्यासक्रमासंदर्भात :** | |
| | १. अधीक्षक व तत्सम पदे: सामान्य राज्यसेवा, गट ब (प्रशासक) जाहिरात क्र. ९०/२०२२ | आयोगाकडून सदर पदासाठी अभ्यासक्रम दिनांक २१.०३.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. |
| | २. कनिष्ठ वैज्ञानिक, गट ब | आयोगाकडून सदर पदासाठी अभ्यासक्रम दिनांक २७.०७.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. |
| | ३. सहायक व भूवैज्ञानिक, गट ब | |
| | ४. सहायक संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय. | सदर पदाचा अभ्यासक्रम तयार असून, मान्यतेबाबतची कार्यवाही सुरु आहे. |
| | ५. अधिव्याख्याता, गट ब (जाहिरात क्र. ११५/२०२३) | सदर पदाचा अभ्यासक्रम तयार असून, मान्यतेबाबतची कार्यवाही सुरु आहे. |
| ०२ | **निकालासंदर्भात :** | |
| | १. न्यायिक सेवा (JMFC) - २०२३ | विभिन्न मा. न्यायालयांत प्रकरणे दाखल असून स्थगिती असल्याने अंतिम निकाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | २. सहाय्यक आयुक्त, बीएमसी | मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही सुरु आहे. |
| | ३. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंड अधिकारी, गट अ २०२२ (पूर्व परीक्षा) | दिनांक १२.०३.२०२४ रोजी पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. विभिन्न मा. न्यायालयांत प्रकरणे दाखल असून अंतिम आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | ४. पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षा-२०२३ | प्रकरण मा. मॅट, मुंबई येथे सुनावणीस आहे. अंतिम न्यायनिर्णयानंतर निकाल जाहीर करण्यात येईल. |
| | ५. दंतशल्यचिकित्सक, गट ब | मा. न्यायालयात प्रकरण दाखल असल्याने कार्यवाही प्रलंबित आहे. |

| | | |
|---|---|---|
| ०३ | **मुलाखतीसंदर्भात :** | |
| | १. प्रशासकीय अधिकारी, सा.आ.से., गट ब | छाननीच्या अनुषंगाने शासनाच्या संबंधित विभागांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | २. एमपीएससी सहाय्यक प्राध्यापक भरती २०२३. | सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागागवर्गीयांकरिता आरक्षण अधिनियम - २०२४, दि. २६.०२.२०२४ च्या अनुषंगाने आरक्षण निश्चितीकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. |
| | ३. तालुका क्रीडा अधिकारी, गट ब (जा.क्र. ७४/२०२२ व ३०/२०२३) | सदरहू पदाच्या अर्जांची छाननीची कार्यवाही क्रीडा विभागाच्या तज्ञांकडून सुरु आहे. |
| ०४ | **परीक्षांसंदर्भात :** | |
| | १. औषध निरीक्षक: (जा.क्र. २५५/२०२१) | प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्याबाबत शासनाकडून कळविण्यात आले आहे. |
| | २. महाराष्ट्र वन सेवा, गट अ. | सन २०२३ करिता मागणीपत्र प्राप्त झालेले नाही. |
| | ३. सहाय्यक आयुक्त, B.M.C. | मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही सुरु आहे. |
| | ४. सहाय्यक नगर रचनाकार श्रेणी-०१. | संबंधित विभागास शिफारशी पाठवण्यात आलेल्या आहेत. |
| | ५. कनिष्ठ भूवैज्ञानिक आणि सहाय्यक भूवैज्ञानिक. | सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागागवर्गीयांकरिता आरक्षण अधिनियम- २०२४ च्या अनुषंगाने आरक्षण निश्चित करुन सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनास कळविण्यात आले आहे. |
| | ६. अधीक्षक, सामान्य राज्यसेवा, गट ब (१४ महिन्यांपासून) | आयोगाकडून सदर पदासाठी अभ्यासक्रम दिनांक २१.०३.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. |
| | ७. वरिष्ठ संशोधन अधिकारी (जाहिरात क्र. १५/२०२०) | सदर पदासाठी घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेच्या निकालाच्या आधारे पात्र उमेदवारांच्या अर्जांची छाननी शासननियुक्त तज्ञांकडून करण्यात आली. तज्ञांच्या अहवालानुसार पात्र उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २८.०३.२०२४ रोजी घेण्यात आल्यात. तसेच, प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने अपात्र ठरलेल्या उमेदवारांनी मा. महा. प्रशासकीय न्यायाधिकरण (मुंबई, नागपूर व औरंगाबाद) येथे दाखल न्यायालयीन प्रकरणी झालेल्या अंतरिम आदेशानुसार काही उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ३०.०४.२०२४ रोजी आयोजित करण्यात आल्या आहेत. |
| | ८. प्रशासकीय अधिकारी (जाहिरात क्र. २४/२०२२) | छाननीच्या अनुषंगाने शासनाच्या संबंधित विभागांकडून पत्राद्वारे माहिती मागविण्यात आली आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | ९. प्रशासकीय अधिकारी (जाहिरात क्र. १०५/२०२१) | वरीलप्रमाणे |
| | १०. प्रशासकीय अधिकारी (जाहिरात क्र. ७९/२०२२) | मुलाखती झाल्या असून, अंतिम निकालाची कार्यवाही सुरु आहे. |
| | ११. सहाय्यक प्रशासकीय अधिकारी (जाहिरात क्र. ५५/२०२२) | शासन नियुक्त तज्ञांकडून उमेदवारांच्या अर्जांची छाननीच्या अनुषंगाने अनुभवासंदर्भात शासनाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | १२. महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२४ | प्रस्तुत परीक्षेमध्ये समाविष्ट सर्व संवर्गाकरिता सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागागवर्गीयांकरिता आरक्षण अधिनियम-२०२४, दिनांक २६.०२.२०२४ च्या अनुषंगाने आरक्षण निश्चित करुन सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या संबंधित विभागांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. शासनाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | १३. समाजकल्याण अधिकारी, गट ब व इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट ब संयुक्त चाळणी परीक्षा. | प्रस्तुत दोन्ही संवर्गाकरिता सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागागवर्गीयांकरिता आरक्षण अधिनियम-२०२४, दिनांक २६.०२.२०२४ च्या अनुषंगाने आरक्षण निश्चित करुन सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या संबंधित विभागांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. शासनाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| **०५** | **जाहिरात प्रसिद्ध; पुढील कार्यवाही :** | |
| | १. भुवैज्ञानिक, गट अ खनिकर्म (जाहिरात दिनांक २१/०९/२०२२), १११/२०२२, ११२/२०२२) | सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागागवर्गीयांकरिता आरक्षण अधिनियम-२०२४ च्या अनुषंगाने आरक्षण निश्चितीकरिता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. |
| | २. पाणीपुरवठा विभागाअंतर्गत असलेले भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाची कनिष्ठ वैज्ञानिक, गट ब | |
| | ३. सहाय्यक भू वैज्ञानिक गट ब अनुक्रमे १९ डिसेंबर २०२२ रोजी प्रसिद्ध झाली. तसेच, १३४/२०२३ | सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागागवर्गीयांकरिता आरक्षण अधिनियम-२०२४ च्या अनुषंगाने आरक्षण निश्चित करुन सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत पत्राद्वारे कळविण्यात आले. शासनाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | ४. सहाय्यक भूभौतिक तज्ञ दि. ०५ डिसेंबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध होऊन या परीक्षांबाबत एमपीएससीने अद्यापि कोणतीही माहिती दिलेली नाही. | |
| **०६** | **शारीरिक चाचणी संदर्भात :-** | |
| | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट ब मुख्य परीक्षा-२०२२ या परीक्षेतील पोलीस उप निरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणी कार्यक्रमाबाबत | पोलीस महासंचालक कार्यालयाकडे यासंदर्भात मागणी करण्यात आली होती. तथापि, निवडणूक प्रक्रिया सुरु असल्याने, मनुष्यबळ उपलब्ध करण्यात अडचणी येत असल्याने शारीरिक चाचणीचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. मनुष्यबळ उपलब्ध झाल्यावर शारीरिक चाचणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. |

ठिकाण : नवी मुंबई

उपसचिव (समन्वय)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग